Saturday, 06 Oct, 7.00 pm

हिन्दुस्थान समाचार Hindusthan Samachar

A

A

A

मुख्य बातमी

# सरकारच्या दुर्लक्षामुळे 'एसएमई' उद्योगक्षेत्र संकटात; तज्ज्ञांचे मत

मुंबई, ६ ऑक्टोबर (हिं.स.) - एकूण उत्पादन,निर्यात आणि रोजगार निर्मितीत सिहांचा वाटा उचलणाऱ्या लघु आणि मध्यम उद्योगक्षेत्र (एसएमई) सरकार आणि बँकांच्या दुर्लक्षामुळे संकटात सापडले असल्याचे मत मुंबईत शनिवारी पार पडलेल्या "एसएमई" मॅन्युफॅक्चर्स अँड एक्स्पोर्टर्स समीटमध्ये तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आले. "एसएमई" उद्योजकांना अर्थसहाय्य करण्यास बँका अनुत्सुक असल्याने उद्योजकांना भांडवलासाठी झगडावे लागत असल्याचे मुद्दे चर्चासत्रात मांडण्यात आले. एसएमई आणि एमएसएमई उद्योजकांसाठी केंद्र सरकार, वाणिज्य मंत्रालय आणि इतर संस्थांमधून पत पुरवठ्याचे अनेक पर्याय आहेत, मात्र या योजना उद्योजकांपर्यंत पोहचत नाही. बँकांकडून त्यांचे पालन केले जात नाही, परिणामी उद्योजकाला अर्थ सहाय्य मिळवण्यासाठी कसरत करावी लागते, असे मत एसएमई चेंबरचे ऑफ इंडियाचे संस्थापक अध्यक्ष श्री. चंद्रकांत साळुंखे यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की केंद्राची मेक इन इंडिया योजना उद्योजकांना प्रोत्साहन देण्यास अपयशी ठरली. गेल्या तीन वर्षात उत्पादन क्षेत्रात नव्याने उद्योग सुरु केलेल्यांची संख्या नगण्य आहे.

यामागे जमिनीचे दर, भांडवलाचे मर्यादित स्रोत, चढे व्याजदर, कुशल मनुष्यबळाची वानवा, स्थानिक पातळीवरील राजकीय हस्तक्षेप आदी कारणे आहेत. एसएमई उद्योजकांप्रती उदासीन भूमिकेमुळे बहुतांश बँका "एसएमई" पत पुरवठ्याचे उद्दिष्ट पूर्ण करत नाही. त्यामुळे छोट्या उद्योजकांना सुरळीत विनाअडथळा पत पुरवठा करण्याबाबत केंद्र सरकार आणि रिजर्व्ह बँकेने तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे साळुंखे यांनी सांगितले. कर्जबुडव्या विजय मल्ल्या, निरव मोदी यांच्यामुळे उद्योग क्षेत्राची प्रतिमा मलिन झाली असून बँकांची कठोर भूमिका लघु उद्योगांना मारक ठरत असल्याचे साळुंखे यांनी सांगितले."एसएमई"ना जागतिक बाजारपेठ खुली करून देण्यासंदर्भात "एसएमई चेंबर" ने इतर देशांमधील भारतीय दूतावासमध्ये एसएमई विभाग सुरू करण्याची मागणी सरकारकडे केली असल्याची माहिती श्री.

चंद्रकांत साळुंखे यांनी दिली. उद्योजकांना द्विपक्षीय व्यापार, मुक्त व्यापार करार ( एफटीए) यासंदर्भात

माहिती नसल्याने त्यांना लाभ घेता येत नाही, असे त्यांनी सांगितले. या परिषदेला नॅशनल स्टॉक एक्स्चेंजचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रम लिमये, वास्तू हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशनचे संस्थापक संचालक पी. एच रवीकुमार, हायमेडियाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक डॉ. जी एम. वारके, एमिरेट्स एनबीडी बँकेचे शरद अगरवाल आदी उपस्थित होते.

A
A
A

लघु उद्योजकांसाठी राष्ट्रीय शेअर बाजाराचे "आरएक्सआयएल" आणि " एनएसई इमर्ज" हे दोन पर्याय उपलब्ध आहेत. आतापर्यंत 175 कंपन्याची या लघु उद्योजकांच्या मंचावर नोंदणी झाल्याचे लिमये यांनी सांगितले. संस्थात्मक गुंतवणूकदार देखील "एसएमई" कंपन्यांमध्ये गुंतवणूक करत असल्याचे ते म्हणाले. नुकताच राष्ट्रीय शेअर बाजाराने लंडन स्टॉक एक्सचेंजसोबत करार केला आहे.

लंडन स्टॉक एक्सचेंजचा एसएमई उद्योजकांना सहकार्य करणारा उपक्रम आहे. हा उपक्रम भारतात सुरू कर्जासाठी "एनएसई" प्रयत्न करेल, असे लिमये यांनी सांगितले. बँका, वित्त संस्था, बड्या कंपन्या यांनी लघु उद्योजकांना भागीदार म्हणून सामावून घ्यावे, असे आवाहन लिमये यांनी केले. एसएमई उद्योजकांच्या विकासासाठी राष्ट्रीय शेअर बाजार कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

मायक्रोबायोलॉजी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या हायमेडिया कंपनीची यशोगाथा यावेळी कंपनीचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक डॉ. जी एम वारके यांनी उपस्थित उद्योजकांसमोर मांडली. उद्योजकांनी जागतिक बाजाराशी स्पर्धा करेल अशी गुणवत्तापूर्ण उत्पादन निर्मितीला प्राधान्य द्यावे, आयपीआर कायदा समजून घ्यावा, असे वारके यांनी सांगितले. लघु उद्योजकांपुढील समस्यांचा त्यांनी आढावा घेतला.

पी. एच. रवीकुमार यांनी पत पुरवठ्यातील अडथळ्यांचा धांडोळा घेतला. उद्योजकांनी तंत्रज्ञान वापराला प्राधान्य दिले पाहिजे. पत मानांकन नसल्याने बऱ्याचदा बँका लघु उद्योजकांना मोठी कर्जे देण्यास तयार होत नाही.

त्यामुळे आता लघु आणि मध्यम उद्योजकांनी क्रेडिट रेटिंगला गांभीर्याने घेणे आवश्यक असल्याचे रवीकुमार यांनी सांगितले. मालमत्ता गहाण ठेवून कर्ज घेण्याऐवजी मजबूत उलाढाल करून कर्ज घेण्याचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. अगरवाल यांनी दुबईतील गुंतवणूक संधी आणि एमिरेट्स एनबीडी बँकेच्या उद्योजकासाठीच्या योजनांची माहिती दिली. या परिषदेला डीजीएफटीचे सहसंचालक श्री.

ए के झा,दोहा बँकेचे श्री. मनिष माथूर, एमएसएमई डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूटचे संचालक श्री. ए आर गोखे,

सिमेन्सचे श्री. हेमंत नार्वेकर यांनी विविध चर्चासत्रात सहभाग घेतला.

हिंदुस्थान समाचार

Dailyhunt

A

A

A